# PUC II Year Annual Examination 2023
# SCHEME OF VALUATION
# Sub. - Marathi
# Sub Code – 07 (NS)

प्रश्न 1 अ अधोरेखित शब्दांच्या विभक्ती कंसातील योग्य पर्याय निवडून लिहा. गुण

| | | | |
|---|---|---|---|
| 1. नामदेव | – | प्रथमा विभक्ती | 1 |
| 2. नागरिकांनो | – | संबोधन विभक्ती | 1 |
| 3. विज्ञानाची | – | षष्ठी विभक्ती | 1 |
| 4. शहरात | – | सप्तमी विभक्ती | 1 |
| 5. पुण्याहून | – | पंचमी विभक्ती | 1 |

ब) खालील वाक्प्रचारांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| 6. पदर पसरणे | – | याचना करणे | 1 |
| 7. कापरे भरणे | – | भीती वाटणे | 1 |
| 8. जीवाचे रान करणे | – | खूप कष्ट करणे | 1 |
| 9. बेगमी करणे | – | साठा करणे | 1 |
| 10. श्री गणेशा करणे | – | प्रारंभ करणे | 1 |

क) खालील कंसात दिलेले योग्य शब्द जोडून म्हणी पूर्ण करा.

| | |
|---|---|
| 11. कोल्हा काकडीला राजी | 1 |
| 12. ठकास महाठक | 1 |
| 13. भीक नको पण कुत्रा आवर’ | 1 |
| 14. कोळसा उगळावा तितका काळाच | 1 |
| 15. लहान तोंडी मोठा घास | 1 |

ड) खालील समूह दर्शक वाक्यासाठी योग्य पर्यायाची निवड लिहा.

| | | |
|---|---|---|
| 16. स्वत:शी केलेले भाषण | – स्वगत | 1 |
| 17. नाटकाच्या प्रारंभीचे स्तवन गीत | – नांदी | 1 |
| 18. दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा | – मनकवडा | 1 |
| 19. गावातील एकत्र पाणी भरण्याची जागा | – पाणवठा | 1 |
| 20. अगदी पूर्वी पासून राहणारे | – आदिवासी | 1 |

प्रश्न 2 रा. अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.

| | |
|---|---|
| 21. वीरराणी कित्तूर चन्नम्माने धारवाडचे कलेक्टर थॅकरे याचा पराभव केला. | 1 |
| 22. लष्कराच्या छावणीचा तळ मौजे दलवटणे, ता चिपळूण या गावी होता. | 1 |
| 23. महाराष्ट्रातील पहिल्या डॉक्टर स्त्रीचे नाव डॉ. आनंदीबाई जोशी. | 1 |
| 24. आजीला वड, चिंच, फणस या झाडाची उपमा दिली आहे. | 1 |
| 25. ‘ ग्यानबा तुकाराम’, संत ज्ञानेश्वर , संत तुकाराम या दोन संताचा महाराष्ट्रात शेकडो वर्षे जयघोष घुमवित आहोत. | 1 |
| 26. जव्हारला आदिवासी वसतीगृह बांधायची कल्पना गं. बा. सरदार यांच्या वडिलांची होती. | 1 |

ब. **खालील पैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** 6

27. एक बाई (आई) पाणी आणण्यास निघाली, तिच्याघरी वडीलधारी व लहान कोणी नाही. अशावेळी गोसावी आले. राऊळो थोडा वेळ माझ्या मुलाला घ्या मी घागरभर पाणी आणते. गोसाव्याने लहान बाळाला घेतले, खेळवियले व बाळ झोपले. जाड वस्त्र घेतले थोड्या भागावर झोपविले व उरलेला भाग अंगावर घातला निघून गेले. आई पाणी घेऊन आली. घरात, पाळण्यात व बाजलेवर पाहिले पण बाळ दिसले नाही. मग शेजारणिला विचारले राऊळाने तुमच्याकडे बाळाला दिले आहे का? राऊळाच्या हातात कशाला दिले राऊळ वेडे राऊळ पिसे ती परत घरात गेली, तेव्हा जाडवस्त्र ( पाखाल) हलले. पाहते तर आत बाळ झोपले होते. तिने बाळाला उचलून घेतले राऊळ माय , राऊळ बापु सुखी व आनंदीत झाली.
माय पूता बुझावणी– एक म्हातारी ( आई) एकुलता एक मुलगा आईवर रागावून निघाला होता. त्याचे मागे म्हातारी. त्यावेळी गोसावी विहिरी जवळून जात होते. तिथे म्हातारीची भेट झाली. तिने दंडवत घातले. विनंती केली माझा मुलगा रुसलेला आहे. तो रहायला तयार नाही. गोसाव्याने म्हातारीचा हात धरला व दोघांची समजूत घातली मग दोघे घरी गेले. स्वभावगुण संकटकाळी दुसऱ्यांना मदत करणे, सहकार्य करणे, समानतेने पाहणे , लहान मुलांवर प्रेम करणे, भांडण मिटविणे, समजूत घालणे दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होणे.

**28. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तीन दैवते. १) विद्या, २) विनय , ३) शील** 6

**विद्या** - विद्येशिवाय शांतता, माणसुकी नाही, सर्वांना अवगत, विद्या महासागरासारखी, अन्नाएवढी विद्येची आवशयकता, धर्मांमुळे विद्या नाही विद्येचे वेड २० हजार पुस्तके, उधारी वर पुस्तके

**विनय :** याचना नाही, पोट भरले पाहिजे , सेवा , तेरा व्याख्यान व दोन व्याख्यान, सेवा करण्यासाठी कण्या भाकरी, कोणापुढेही याचना केली नाही. स्वत:साठी काही मागीतल नाही. स्वाभिमानाने जगतो.

**शील :** दगाबाजी, फसवणूक केली नाही, विलायतेला गेलो दारू घेतली नाही कसाही व्यसन नाही पुस्तक कपडा प्रिय, शील संवर्धन गुण मोठा अभिमान.

**क) संदर्भासह स्पष्ट करा ( कोणतेही दोन )** 3

29. पाठाचे नाव : मराठियाची तो इज्जत वाचणार नाही.
लेखक – प्रा. अ. रा. कुलकर्णी
शिवकालीन ऐतिहासिक पत्र

स्पष्टीकरण : छत्रपती शिवाजी महाराजानी मुक्काम मौजे दलवटणे या ठिकाणी असणाऱ्या सैनिकांना उद्देशून पत्र लिहलेले आहे. सैनिकांनी छावणीच्या आसपास राहणाऱ्या लोकांना कोणताच त्रास देऊ नये. कोणी दाणे, भाकर, गवत फाटे, भाजी पाले जर मागू लागले तर रयतेला त्रास होऊन उपाशी राहतील तुमच्या त्रासाला कंटाळून वरील वाक्य म्हंटलेले आहे. विशेष : ऐतिहासिक पत्र व भाषाशैली

30. पाठाचे नाव – आजीचे भाष्य 3
लेखक – डॉ. शिवराम कारंथ
अनुवाद – सौ मीना वांगीकर

स्पष्टीकरण :– आजीचा लहानपणीच विवाह झाला होता पण सहा महिन्यातच नवरा मरण पावला. आजी माहेरीच वास्तव्याला आली. ती परत सासरी गेली नाही. आजी जेव्हा म्हातारी झाली व आजोबाचे वय ही झाले तेव्हा आजोबा वरील वाक्य आजीला म्हणतात.

31. पाठाचे नाव – जीवनाची सांयकाळ 3

लेखक – वि.वा. शिरवाडकर

नाटक : नटसम्राट

स्पष्टीकरण :– अप्पासाहेब बेलवलकर व कावेरी नलुच्या घरी राहत असतात. नलुच्या पतीचे पगाराचे पाकीट चोरीला जाते. घरातील सर्व माणसांची झडती घेतात. अप्पासाहेव व कावेरीच्या खोलीची झडती नलू घेते. नलू आपल्या आई– वडिलांवर चोरीचा आरोप करते. पण पैशाचे पाकीट घरातच सापडते ही बातमी कावेरीला समजते. पैश्याचे पाकीट सापडले त्यावेळी कावेरी वरील वाक्य अप्पासाहेब बेलवलकरांना म्हणते.

**ड. टीपा लिहा. ( कोणत्याही दोन )** **4**

32. सईचा नवरा रामा भिगंरे यांचा मृत्यू होतो. सई विधवा होते. सईला एक मुलगा असतो त्याचे नाव रामा सई दुसऱ्याच्या घरी काम करून आपला संसार चालवित असते. सई देखणी असते ती ज्या रस्त्यावरून कामाला जात असते त्या रस्तावर बाळा गवंडी घर बांधत होता. बाळा गवंड्याची नजर सईवर गेली. सई देखणी म्हणून चावटपणा सुरू केला. सईने कानाडोळा केला. बाळा गवंडी भला धष्ट पुष्ट, काळा कुळकुळीत, रंगेल होता. हाता खालच्या बायका माणसांना ए काकी कुणाला ए नानी म्हणून हाक मारीत , जवळ आली की रोखून पाहत असे, मुंडेछाट पांढरी पैरण , डोईला जरीचा ताबंडा – लाल रुमाल, हातात चांदीचे कडे ऐट होती , देखणी बाई दिसली अस्वथ होत. 'ए भानामती" , ए रंगारानी अशा शृंगारिक हाका मारत. खोट्या नजरेचा व चावट स्वभावाचा होता. कोणी दिनवाणी दिसली तर आडपडद्याने पण निर्भयपणे तो वाईट बोलत. सईला एकू जाईल असे म्हणाला " कुठल पाखरू हाय र? सईला समजले आपल्यालाच बोलतो आहे. सई म्हणाली "अर मुरदाडा , मला रंडकी , मुंडकीला बघून चावटपणा करतोस तुला आया बहिणी आहेत की नाहीत. पटकी आली, मालक मरून गेल्यात पण त्यांचा जोडा जपून ठेवलाय , पुन्हा अस बोललास तर त्याच जोडयान तुझ पोट फोडल्या बिगर राहणार नाही ". अशा प्रकारे सईने शब्दाच्या शस्त्राने बाळा गवंड्याला अद्दल घडविली.

33. जमिनीची धूप थांबविणे, सेंद्रीय खताचा वापर,लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे, दैनंदिन जीवनात 4
यंत्राचा वापर कमी करणे, रासायनिक कारखान्यावर निर्बंध लादणे, सौरऊर्जेचा वापर करणे, झांडाचे संवर्धन करणे, प्रदूषण संबंधी कडक कायदे व अंमलबजावनी करणे, जैविक व रासायनिक शस्त्राचा वापर न करणे, वाहनाचे भोंगे विनाकारण वाजवू नये. फटाक्याऐवजी शोभेची दारू वापरावी, पान तंबाखू खाऊन थुंकू नये. आपल कुटूंब मर्यादित ठेवावे. विकासाच्या कल्पना बदलल्या पाहिजेत, जगात शांतता प्रस्तापित करणे इ.

34. 12 ते 18 वर्षापर्यंतच्या वयाला इंग्रजीत ' टीन एजर्स ' व मराठीत त्याला वाढाळू वय म्हणतात 4
या काळात शारीरिक, मानसिक बदल मोठया प्रमाणात होतात. अशा वेळी त्याच्या स्वभावात व वर्तनात बदल होतो. या वयातील मुलांच्या ठिकाणी आत्मविश्वास पूर्ण नसतो. भिन्न लिंग जोडीदाराचे अस्फूट अबोध आकर्षण मनाला जाणवू लागते. पण संकोचामुळे व सामाजिक बंधनामुळे मुले मानसिक व भावनिक पातळीवर राखण्याची काळजी घेतात. जगाचे गुढ, गुंतागुंतीचे व काटेरी आडवाटांनी म्हणजे समस्येने भरलेले स्वरूप त्यांना माहीत नसते. स्वप्नरंजन ही या मुलांची मानसिक गरज , क्रीडा, अभिनय, संगीत साहित्य अशा विविध क्षेत्रातील आदर्श मुलांचे असतात . कोणत्याही आदर्शात मुले आपले रूप बघत असतात. साहसकथा वाचून उत्साहाला वाट देतात. रोमॅंटिक कथा, कादंबऱ्या वाचून स्वप्नरंजनात रमबाण होतात. बावरून जातात. स्वत:ला फारसे काही समजत नसते तरी समजले आहे असा खोटा आव आणतात. अंहकार जास्त असतो. हताश होण्याचे हेच वय शारीरिक व भावनिक प्रवास अवघड असतो. अशा काळात आई वडिलांनी मित्रत्वाच्या नात्याने राहणे आवश्यक असते.

प्रश्न 3 रा. खालील पैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे द्या.

35. चंद्रायुध भित्र्याच्या हाती असू नये. 1

36. मानवाने संसारात सुख मानले आहे. 1

37. विठ्ठलाच्या नामस्मरणाने पापाचे पर्वत जळतील 1

38. सासुरवाशिण नणंदेच्या पोराला खरूज होऊ दे म्हणत आहे. 1

39. शहिराने जनतेला रात्र आहे वैऱ्याची जागा रहा असा इशारा दिला आहे. 1

40. शेतात माणूसकी उगवता उगवत नाही 1

**ब) खालील पैकी कोणत्याही एका प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा. 6**

41. नलराजाच्या बागेत विहार करण्यासाठी जातो. नलराजाचे लक्ष सोनेरी हंस पक्ष्याकडे जाते. राजाच्या मनात हंस पक्ष्याच्या सोन्यापासून अलंकार करावेत असे वाटते. हंस पक्ष्याला पकडतो त्यावेळी हंस पक्षी सांगतो माझ्या म्हाताऱ्या आईला आकाशात विहार करता येत नाही, ती घरीच असते. माझ्या पत्नीविषयी काय सांगू ? ती प्रसव झाली आहे. सात दिवस झाले आहेत. या सर्वांचे पालन करणे माझी जबाबदारी आहे . तू माझा घात करण्याची योजना आखत आहेस. हे हंस पक्षाचे मनोगत एकून राजाच्या मनात दया निर्माण झाली. मग म्हणाला विहार जा अथवा फिर जा असे म्हणून हंस पक्ष्याची सुटका करतो. हंस पक्षाला आनंद होतो . हंस पक्षी म्हणतो ‘ तू थोर दयासिंधू आहेस ’. दुसरा कोणी राजा नाही, दयेचा ठेवा, देव वसलेला, दयेचा सागर, नितीमान, दीन गरीब, अनाथ, दुःखी यांचा मित्र.

42. जीव माझा गुतंलाय या कवितेत आई आणि लेकीचे नाते उलगडून दाखविले आहे. **6**

आई वाकळ शिवत आहे. त्यावेळी बाळी अत्यंत लहान आहे. आईचे सारख लक्ष बाळीकडे असते. बाळी राजस केळी सोनसावळी सारखी आहे. तिच्या पाऊल खुणांनी जोत, अंगण, दिंडी दरवाजा सजलेला आहे. आता बाळी मोठी झाली. विहीरीवर पाणी आणण्यासाठी, ओढ्याच्या काठी धुंण धुण्यासाठी जाते पण तिची नजर पायावरच असते. तिच्या रुपान गुणान शिवारातील माणस, पिंपळ पारावरील माणस कौतुक करतात. साता समुद्रापलीकडील गुणवंता येतो. बाळीला पसंत करतो. विवाह होतो. बाळी आणि गुणवंता यांची जोडी पाहून राम सीतेची आठवण आईला होते. डोळ्याच पारण फिटते . बाळीचे कुटुंब एकत्र . दहा जणाच्या स्वभावात बाळी नांदते नवरा तिला फार जपतो. आईचा जीव बाळीत गुंतलेला आहे.

क. संदर्भासह स्पष्ट करा( कोणतेही दोन )

43. कवितेचे नाव – पसायदान 3
संत – ज्ञानेश्वर

स्पष्टीकरण : संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी पूर्ण झाल्या नतंर विश्वात्मक परमेश्वराकडे आखिल मानवजाती साठी पसायदान मागितले आहे. जगाच्या कल्याणाकरिता , दुःखी, कष्टी, अज्ञानी लोकांच्या जीवनातील अंधकार व अज्ञान नाहीसे व्हावे. विश्वातील सर्व माणसाच्या हातून चांगल्या कर्माचा विकास होऊ दे. या विश्वातील मानवजात त्याच्या ज्या ज्या इच्छा आकांशा आहेत त्या सर्व पूर्ण होऊ देत.

44. कवितेचे नाव – विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर 3
कवी – वामन निंबाळकर

स्पष्टीकरण – विसाव्या शतकाच्या टोकावर या कवितेतील नायक भूतकाळातील अनेक समस्यांना तोंड व संघर्ष करीत वर्तमान काळातील समाजाचे वास्तव व भेसूरपण दिसून येते. समाजातीले विषमता , दैन्य, दारिद्रय पिळवणूक दूर करण्यासाठी नायक स्वप्न पाहत आहे. मानवतेची इंद्रधनुष्य कमान सर्व लोक समाधानाने , मानवता धर्म मानून जीवन जगत आहेत. हे स्वप्न साकार करण्यासाठी एकलव्याच्या अंगठयातील रक्ताचे मोल नायकाला माहित आहे. समाजाचे स्वप्न साकार करण्यासाठी कधीही माघार घेणार नाही असा आशावाद व्यक्त केला आहे.

45. कवितेचे नाव – सखी 3

कवयित्री – हिरा बनसोडे

स्पष्टीकरण:– ही कविता दलित कविता असून या कवितेत एक सवर्ण जातीतील व दलित स्त्री दोघींची मैत्री असते. दलित स्त्री सर्वण जातीतील आपल्या सखीला घरी जेवायला बोलविते ती येते आनंद फार होतो. जात विसरून आली आहे असे वाटते. ताट सजविते ते पाहून सवर्ण जातीतील स्त्री म्हणते पान वाढ्यायला तुला येत नाही. तुमची जात कधीच सुधारणार नाही सवर्ण जातीतील सखीचे जेवण संपता संपता ती वरील ओळी दलित स्त्रीला विचारते. तिचे उरलेले अवसान ही गळून जाते.

**ड. टीपा लिहा ( कोणतेही दोन)**

46. सुंदर हिरवे माळ चहूकडे सुंदर हिरवे माळ आहे. आकाशात घनमाला जमली आहे. 4
झिम झिम पाऊस पडत आहे. ग्रीष्म ऋतुचा ताप निवला . शेतीतून कोंभ येऊ लागले. बोरवनाची सुकलेल्या पानांना नवीन पालवी आली. बाभळी चैतन्याने, आंनदाने डोलू लागल्या आहेत. मोठया मोठया दगडाखाली हिरवळ आली आहे. हिरवळ मराठमोळी तरूण कुमारी लाजून लडिवाळे पाहते तसे पाहत आहे. इकडे– तिकडे भोवती हिरवेपण दिसून येत आहे. पानावर पडलेले पावसाचे थेंब. त्यावर पडलेले सूर्यप्रकाशाच्या किरणानी माळावरच्या वनराणीला नजरानांच दिला आहे. सुकलेल्या ओढ्यातून धावपळ करीत पाणी वाहत आहे. त्यातून गीत मोहिनीचा मंजूळ आवाज जसे नर्तकी पायामधील चाळ वाजवित आहे. सांयकाळी गुरे पोट भरून परत गावाकडे जात आहेत. ढगांच्या सावल्या पडलेल्या आहेत. क्षितीजांवर वेगवेगळ्या रंगाची उधळण आहे. सह्याद्री पर्वत रांगेत एकटाच राजमहाल एटीत उभा आहे. राने, गुरे–वासरे, झाडे, रानपाखरे सगळ्यांना समाधान वाटत आहे. पण शेतकरी कष्ट करून ही उपाशी आहे.

47. गोफ ही कविता गोविंदाग्रजानी लिहीलेली आहे. गोफ हे प्रेमाचे प्रतिक आहे. 4
या कवितेतील सखा आणि सखी प्रेमाचे पदर आणतात. दोघांच्या प्रेमाच्या पदरांनी ( भावनांनी) प्रेमाचा गोफ विणत जातो. प्रेमाचा खेळ रंगत जातो. त्याची नजरधुंद होते. अवती– भोवती असणाऱ्या गोष्टींचा विसर पडतो. कोणी निंदा, स्तुती, हसले , रडले तिकडे पाहिले नाही. दोघेजण प्रेमात पूर्ण बुडाले होते. पण दैवाचा खेळ निराळाच होता. सखीला प्रेमाचा खेळ नकोसा झाला. ज्या खेळाने जीव रंगला होता. त्याचा तिला कंटाळा आला . प्रेमाचा गोफ उलघडण्याचा कठीण काळ आला. सख्याला फार दु:ख झाले, कस सांगू प्रेमाचे धागे हळू हळू ओढ. एवढी का घाई आहे. चुकून भलताच धागा ओढलास आणि तुटला तर दु:ख होईल. जीव जाईल थांब घाई करू नकोस, शांत बुध्दीने सोडवू. एक ही पदर तुटला नसला पाहिजे नाही तर जग आपल्याकडे पाहून हसेल. खरंच प्रेमासाठी एकत्र आलो होतो की दूर होण्यासाठी. प्रेमाचा पीळ कायम दु:ख देत राहील. आज दु:खाने निस्तरणे नशिबी आले आहे. व्यवहारात जोडणे कठीण तोडणे सोपे वाटते. पण प्रेमामध्ये जोडणे सोपे तोडणे कठीण वाटते हा अनुभव आला.

48. 'आई' या कवितेत फ. मु. शिंदे यांनी आईचे महत्व सांगितले आहे. 4
आई एक नाव असत घरातल्या घरात गजबजलेल गाव असते . ती जेव्हा असते तिची जाणीव असत नाही. नसली तर नाही म्हणवत नाही.आई मनामनात जाते ठेवून काही जिवाच जिवालाचं कळाव असे देऊन काही. आई एक धागा असतो वातीला उजेड दावणारा समईतला जागा. असते तेव्हा घर उजळत तेव्हा तिच नसत भान, अंधारात विझून गेली की सैरावैरा धावायला ही कमी पडत रान, आई आणि मुलांचे नात , प्रेम,

गाय आणि वासरू. आई लेकरांची माय असते . वासराची गाय असते , दुधाची साय असते, लंगडयाचा पाय असते. धरणीची ठाय असते. आई नसते तेव्हा घरातल्या घरात डबडबलेल गाव असते.

**प्रश्न 5 वा. खालील पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. 5**

49. पाझर या कथेतील बाबल बनपाव विकण्याचा व्यवसाय करत असतो तसेच सल्ला घालण्याचे काम करत असतो. सगळ्यांना दादा , मामा आपुलकीने, जिव्हाळ्याने बोलवत . गावचे लोकही त्याचे कौतुक करतात. एक दिवस संसदेवर अतिरेकी हल्ला करतात. आबा पाटलाच्या जोत्यावर गावातील पोरं बातम्या एकत असतात. तिच तिच चित्रे, त्याच त्याच बातम्या ते पाहून पोरांच्या मनात राग निर्माण होतो. दुसऱ्या दिवशी बाबल बनपावचे डबे सायकला लावून विकण्यासाठी जात असतो. मारूतीच्या देवळा जवळ नेहमीच गॅंग बसलेली. मान्याच पोर पळत गेल. सायकल अडवली. पारा जवळ आणल. बाबल तुझ्या भाऊबंदानी काय केल बघितलस. बाबलला काहीच समजल नाही, वडा म्हटंल्या बरोबर पोरांनी बाबलची सायकल आपटली. दोघे तिघे अंगावर धावले. बाबलने गोंदा पाटलांचे घर गाठल. गावात चर्चा सुरू झाली. गोंदा पाटलांन पंचाना बोलविले . सगळ गाव जमल. मारणारी पोर ही आली . ‘ बाबल का मारला? ‘ पण त्याच उत्तर नव्हत. गोंदा पाटलांन बाबलच्या कुटुंबाचा इतिहास सांगितला. मारण्याऱ्या पोरांना जैतुनबीचे पाय धरायला लावले. माफी मागायला सांगितले तरच सुटका अशाप्रकारे गोंदा पाटलान न्याय मिळवून दिला. सर्वाना प्रेमाने बोलविनारा, आदर करणारा, आईला मदत करणारा, प्रामाणिक, वैरत्वाची भावना न ठेवणारा, कष्टाळू व काम करणारा, उध्दट न वागणारा असा बाबलचा स्वभाव.

50. लेखक –योगीराज वाघमारे यांच्या गुडदाणी या कथासंग्रहातून होरपळ ही कथा घेतलेली आहे 5
तात्या हे प्रमुख पात्र , नाना खूप दिवसानी आपल्या गावी, गावाला जात असताना पाठीमागून हाक ‘ जय भीम साहेब ’ पण ओखळ लागत नव्हती पण जवळ गेल्यावर ओळख पटली, तात्या होते, कळकट व मळकट असणारी कपडे, डोकीवरचे केस मागे केलेले , पान खाऊन दात रंगलेले, चेहरा काळपट, अणवाणी अंगावरचा सदरा फाटलेला असे तात्या होते. एके काळचा सामाजिक व राजकीय नेता त्याची अवस्था पाहून नानाला तात्याचे सामाजिक कार्य आठवले. तात्यानी दलित लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार समाजापर्यंत पोहचविले. हक्काची जाणीव करून दिली. समाजाचे प्रबोधन केले. गावकी सोडा स्वाभिमानाने जगा, मुलां मुलींना शाळेत घाला. एक व्हा, संघटीत व्हा, शिका आणि संघर्ष करा. कोणाचे गुलाम होऊ नका, मृत्त मास खाऊ नका. नानाला त्यांनीच शाळेत घातले. दलित समाजातील मुलांना शाळेत स्वत: घेऊन नाव घालत असत. मुलाच्या बारशादिवशी पाळणा म्हणत, एकाही मुलाला गुरामागे पाठवले नाही. दलित समाजातला मुलगा दहावी पास झाला ते स्वत:च्या खर्चाने सत्कार करीत. लग्नाला आलेल्या पोरींच्या वडिलांना तात्यांचा खूप आधार. तात्या लगेच स्थळ पाहत हुंडा नाही काही नाही लग्न जमवत नवरा बायकोचे भांडण तात्याच मिटवत. जयंती उत्सव तात्याच करत. लोक वर्गणी देत. हिशोब सुध्दा विचारत नसत.पोतराजाचे केस कापून त्यांनी क्रांती केली होती. निस्वार्थीपणे कार्य करणारा, कोणत्याही पदाची, प्रसिध्दीची अपेक्षा न बाळगणारा व स्वत: च्या कुटूंबाकडे दुर्लक्ष करून समाज्याच्या विकासासाठी लोकपरिवर्तनासाठी अंखडपणे आयुष्य झिजवणारे तात्या होते.

51. गळफास ही कथा अप्पासाहेब खोत यांनी लिहलेली आहे. व्यसनामुळे कुटुंबाला कसा गळफास 5
लागतो हे सांगितले या कथेतील विलासकाका व अजंना एकूलता एक लाडाने वाढलेला पंडीत कॉलेजमध्ये शिकेल म्हणून घातला. दोन वर्ष नापास झाला. गावात आला. उनाड पोरात राहू लागला. पंडिताला गुटखा खायची सवय, मटण, दारू पिण्याचे व्यसन, रोज धाब्यावर जेवायला जायच, मटका खेळायंच, गावातील पोरींची कळ काढणे , डान्स बारला जाणे. पैसे उडविणे, दारू पिणे, कर्ज काढणे, पैसे उधळणे, आई वडिलांचा आदर न करणे, शेतावर कर्ज काढणे, शेती नावावर करणे, आई वडिलांना न सांगता मोटर सायकल कर्ज काढून घेणे, चैनी करणे फिरणे इत्यादी वाईट सवयी पंडिताला लागल्या होत्या. पंडिताला स्पेंडर मोटार सायकल हवी असते. पण ती घेण्यासाठी विलास काकाकडे तेवढे पैसे नसतात. पंडीत राजमाता पत संस्थेचा कर्जाचा फॉर्म घेऊन येतो व विलासकाकांना सही करण्यास सांगतो. पण विलास काकांना कर्ज काढून मोटार सायकल घेणे पटत नाही. ते सही करण्यास नकार देतात. तस गळफास लावून घेईन पंडीत म्हणतो. शेवटी विलास काका कर्जाच्या

फॉर्मवर सही करतात. पंडिताचे व अंजनाचे वागणे विलास काकांना पटत नाही . यासर्व कौटूंबिक गोष्टीचा पंडिताच्या व्यसनाचा कर्जाचा विलास काकांवर मानसिक परिणाम होऊ लागला व त्यांना अर्धांगवायूचा झटका आला. निम्म शरीर लुळ पडल हा त्यांच्यावर झालेला परिणाम

52. **5**

समस्त गावकरी,<br>
मु.पो.करंबळ,<br>
ता. खानापूर<br>
जि. बेळगाव.<br>
दि. 24.03.2023

प्रति,<br>
ग्राम पंचायत करंबळ,<br>
ता. खानापूर,<br>
जि. बेळगाव

विषय: गावातील गटारी स्वच्छ करण्याच्या बाबतीत.

महोदय,<br>
गावातील गटारी वीस दिवस स्वच्छ न केल्यामुळे गटारी तुंबलेल्या आहेत. घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे. त्यामुळे माश्या व डासांची पैदास जास्त झालेली आहे. त्यामुळे गावात रोग –राईचे प्रमाण वाढलेले आहे. लोकांना ताप येत आहे. गटारीतील दूषित पाणी विहीरीत जात आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. तरी अध्यक्षानी लवकरात लवकर ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांना गटारी स्वच्छ करण्यास सांगावे. त्यामुळे आपले गाव स्वच्छ व निरोगी राहील तरी लवकरात लवकर हे काम हाती घ्यावे ही नम्र विनंती.<br>
कळावे

अर्जदार

1. मोनाप्पा पाटील
2. गणपत शिंदे
3. अरूण कांबळे
4. छाया पाटील

53. मराठी काव्याच्या प्रभात काळचे कवी अगदी स्वतंत्र प्रतिभाचे होते. 1

54. प्रभातकाळातील कवीचे काव्यवाचताना पहाटे गुलाबी थंडीत समुद्र किनारीची गोड झुळूक उपभोगित आहोत असे वाटते 1

55. होनाजी बाळाने अनंत फंदीची तारीफ केली आहे. 1

56. प्रभातकाळचे कवी संस्कृत संस्कृतीच्या पदराखाली झाकले गेले नव्हते. 1

57. होनाजी बाळाने घनश्याम सुंदरा श्रीधरा अरूणोदय झाला हे मधुरपद रचले आहे. 1

निबंधाची सुरूवात आकर्षक असावी, मुद्देसूद मांडणी असावी, सुभाषिते, म्हणी, वाक्यप्रचार, सूवचने यांचा वापर असावा. विद्यार्थ्यांची मते, विचार, प्रगट झालेले असावेत, विषयानुसार मांडणी व अभ्यास असावा, आशयानुसार कारणे व उपाय असावेत, तर्कबध्द मांडणी असावी, परिच्छेद असावेत,

व्याकरणदृष्ट्या वाक्यरचना, शुध्दलेखनाकडे लक्ष असावे, निबंधाचा समारोप आकर्षक असावा, वर्तमानकाळातील समाज पर्यावरण या सर्वांचे प्रतिबिंब पडलेले असावे.

58. भारत देशाची संस्कृती व परंपरा–भारत देशात असणारे धर्म, संस्कृती ,भाषा चालिरीती , **10**
पंरपरा हे विविधतेने असणारा देश, देशाने आजपर्यंत अनेक आक्रमणे पचविली, मध्ययुगीन कालखंड, ब्रिटीश कालखंड, भारताला स्वातंत्र मिळावे यासाठी 150 वर्षे संघर्ष , लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. कार्य , स्वातंत्र्य सैनिकांनी केलेले कार्य, 15 ऑगष्ट 1947 साली भारत स्वतंत्र हे सर्व राष्ट्रीय एकात्मतेमुळेच , भारतीय राज्यघटना, आज देशापुढे असणाऱ्या विविध समस्या, धर्म, भाषा, प्रांत , जात इ. परकिय देशापासून असणारा धोका, दहशतवाद, अशा विविध समस्येसाठी राष्ट्रीय एकात्मता महत्वाची आहे. शाळा , महाविद्यालयात देशभक्ती निर्माण होण्यासाठी व संस्कारासाठी उपक्रम राबविणे आवश्यक.

59. मानवी जीवनात खेळाला अन्यन्य साधारण महत्व, मानवी जीवनात शारीरिक, मानसिक, बौद्धीक **10**
विकास संतुलित झाला तरच योग्य व्यक्तीमत्व घडले जाते. खेळ हा सर्वांचा पाया आहे. खेळामुळे शरीर सदृढ बनते, निरोगी राहते ,प्रतिकार शक्ती वाढते. आजच्या वर्तमान काळात खेळाचे अस्तित्व कमी होत आहे.लहान मुलांपासून ते तरूण वर्गापर्यंत मोबाइल, टीव्ही , संगणक, या आधुनिक साधनामुळे खेळाकडे दुर्लक्ष, क्रींडागणे ओस दिसतात. खेळामुळे सांघिकवृत्ती वाढते, खेळातून चांगले व्यक्तीमत्व आपण करू शकतो. जगात विविध स्पर्धा असतात. देशाचे नेतृत्व करू शकतो म्हणून लहानपणापासून आई – वडिलांनी व शाळा महाविद्यालयानी विविध खेळांची ओढ निर्माण केली पाहीजे.

60. विविध ऐतिहासिक किल्ले, मध्ययुगीन कालखंडात किल्ल्यांना असणारे महत्व, डोंगर दऱ्या **10**
खोऱ्यात शत्रूपासून बचाव होण्यासाठी रायगड हा किल्ला दुर्गम होता . त्या किल्ल्याचा इतिहास राजाने केलेले कार्य त्यांनी बांधलेल्या वास्तू, शत्रूला सहजासजी न येता येणे, तटबंधी, दरवाजे, राज्यकारभार, आदेश, त्यावेळचा सर्व इतिहास, आज वर्तमान काळात किल्ल्याची झालेली अवस्था , मनाला वेदना , समाजाने व तरूण पिढीने आज संवर्धन करणे, आपला इतिहास पुढील पिढीला कळावा , सुरक्षित ठेवणे, किल्ल्याना भेटी देणे, माहिती मिळविणे असे छंद जोपासले पाहिजेत.